केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत वनशेती उप-अभियान राज्यात राबविण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक: शाशेअ-२०१७/प्र.क्र.१२६ /४अे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक: ८ डिसेंबर, २०१७

वाचा:

१. **राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानाच्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना**
२. **वनशेती उपअभियानाच्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना**
३. **मुख्य सचिव कार्यालयाकडून दि. २८ नोव्हेंबर, २०१७ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीचे प्राप्त कार्यवृत्त.**

प्रस्तावना:

देशात मोठया प्रमाणावर शेती पावसावर अवलंबून आहे. तथापि, वातावरणातील बदल, पावसाचा लहरीपणा यामुळे शेती व्यवसाय अत्यंत जोखमीचा झालेला आहे. शेतकऱ्यांना त्यांचे शेती उत्पादन, उत्पादकता आणि उत्पन्न यामध्ये सातत्य ठेवणे अत्यंत कठीण झाले आहे. वनशेतीमुळे नैसर्गिक साधनांचे संवर्धन करुन काही प्रमाणात वातावरणातील बदल सौम्य करण्यास तसेच उपजिविकेचे नवीन स्त्रोत निर्माण करण्यास व उत्पादनात वाढ होण्यास मदत होवू शकते. यास्तव, शेतीवरील पिकांबरोबरच वृक्ष लागवड वाढविण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत (National Mission on Sustainable Agriculture - NMSA) वन शेती उप-अभियान (Sub-mission on Agroforestry - SMAF) राबविण्याचे निश्चित केले आहे. सदर उप-अभियानाच्या मार्गदर्शक सूचना केंद्र शासनाने निर्गमित केल्या आहेत.

ज्या राज्यांनी वृक्षतोड आणि लाकडाची वाहतूक याबाबतचे नियम शिथिल केले आहेत, अशाच राज्यांमध्ये हे उप-अभियान राबविण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्याने याबाबतचे नियम शिथिल केले असल्याने सदर उप-अभियानाच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाने, महाराष्ट्र राज्याची निवड केली आहे. त्यानुसार राज्यात वनशेती उप-अभियानाची अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:

केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत - वनशेती उपअभियान राज्यात राबविण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. उप-अभियानामध्ये केंद्र व राज्य हिश्श्याच्या निधीचे प्रमाण ६०:४० असे राहील

३. सदर उप-अभियान, केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनूसार राबविण्यात येईल.

४. उप-अभियानाची उद्दिष्टे वनशेती उप-अभियानाच्या मार्गदर्शक सूचनांनूसार असतील.

५. उप-अभियानाच्या अंमलबजावणीसाठी कृषी विभाग हा नोडल विभाग असेल.

६. उप-अभियानाचे नियोजन व अंमलबजावणीमध्ये वन विभागाचा सहभाग असेल.

७. उप-अभियानाचे नियोजन व अंमलबजावणीस आवश्यक सहकार्य करण्यासाठी वन विभागाकडून राज्य स्तरावर एका समन्वय अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात येईल. तसेच जिल्हा स्तरावर योजनेच्या अंमलबजावणीसाठी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना आवश्यक सहकार्य करण्यासाठी अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात येतील.

८. सदर उप-अभियानाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या शेतकऱ्याकडे Soil Health Card असणे आवश्यक असेल. वन शेती उप अभियानांतर्गत निवड झालेल्या लाभार्थ्यास तातडीने Soil Health Card उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांची राहील.

९. रोप वाटिकेसाठी लाभार्थीकडून अर्ज प्राप्त झाल्यानंतर व सदर अर्जदार मार्गदर्शक सुचनांनुसार सर्व बाबींची पुर्तता करत आहे, याची खात्री झाल्यानंतर सदर लाभार्थ्यास रोप वाटिकेसाठी आवश्यक बियाणे उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी वन विभागाच्या अधिकाऱ्यांची राहिल.

१०. शेतकऱ्यांना उप-अभियानाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार विहित केलेल्या मर्यादेत अनुदान देण्यात येईल.

११ उप-अभियानासाठी केंद्र व राज्य हिश्श्याची तरतूद करण्यासाठी नवीन लेखाशिर्ष उघडण्यात येतील.

१२. सदर शासन निर्णय वन विभाग, नियोजन विभाग व वित्त विभागाच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१२०८११५३५६८३०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dr.Kiran Patil

Digitally signed by Dr.Kiran Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=657661007c4f6885bf8deae62f136066325 89e592d8c18ceb9a49bfd30471850, cn=Dr.Kiran Patil
Date: 2017.12.08 12:13:28 +05'30'

(डॉ. किरण पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
२. मा. मंत्री (कृषी), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
३. मा. मंत्री (वने), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
४. मा. राज्यमंत्री (कृषी), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
६. अ. मु. स. (वित्त), वित्त विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
७. अ. मु. स. (नियोजन), नियोजन विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
८. सचिव (वने), महसूल व वन विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
९. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे.

१०.संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रतीसह)
११.सर्व संचालक/सह संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२.सर्व विभागीय कृषी सह संचालक,
१३.सर्व विभागीय आयुक्त,
१४.सर्व जिल्हाधिकारी,
१५.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१६.सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
१७.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१८. सर्व कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद
१९.महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय,मुंबई.
२०.महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर
२१.महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा परिक्षा) मुंबई /नागपूर
२२.सर्व सहसचिव/उपसचिव/अवरसचिव/कार्यासन अधिकारी, (कृषि) कृषि व पदुम विभाग
२३.निवड नस्ती.